**धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्याकरिता असलेल्या मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीस मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो)**
शासन परिपत्रक क्र.धडक -२०१६/प्र.क्र.५/रोहयो-५
नवीन प्रशासकीय इमारत, १६ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक - २२ डिसेंबर, २०१७.

**वाचा:-**

१. शासन परिपत्रक क्र.धडक -२०१६/प्र.क्र.५/रोहयो-५, दिनांक २१ मार्च, २०१७.
२. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे पत्र क्र. रोहयो/अका-४/कावि/७७४/२०१७, दिनांक १५ डिसेंबर, २०१७.

**प्रस्तावना:-**

धडक सिंचन विहीर कार्यक्रमाअंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी देण्यात आलेल्या ३०० विहीरींच्या अतिरीक्त लक्षांकाच्याअनुषंगाने लाभार्थी निवडीसाठी जिल्हा निवड समितीस संदर्भाधीन दिनांक २१ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३० जुलै, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी संदर्भ क्र. २ येथे नमूद दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर समितीस प्रशासकीय कारणास्तव मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. त्याअनुषंगाने यवतमाळ जिल्ह्यातील मा. पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखालील निवड समितीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

यवतमाळ जिल्ह्यासाठी धडक सिंचन विहीर कार्यक्रमाअंतर्गत मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली लाभार्थी निवडीसाठी गठीत करण्यात आलेल्या समितीस दि. ३० जून, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच यापूर्वी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(डॉ. प्रमोद शिंदे)**
**उपसचिव (रोहयो)**

C:\Users\avc\Desktop\kalpesh nagpur २०१७\c.r.५ २०१६ Ext..docx

Scanned by CamScanner

१. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
२. मा.मंत्री (रोहयो), यांचे खाजगी सचिव,
३. सर्व मा.मंत्री, / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मुख्य सचिव यांचे सहसचिव
५. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती
६. जिल्हाधिकारी, यवतमाळ
७. उप जिल्हाधिकारी, (रोहयो)यवतमाळ
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ
९. कार्यकारीअभियंता, लघु सिंचन विभाग जिल्हापरिषद यवतमाळ
१०. मा. सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई
११. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१२. महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
१३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर,
१४. सहायक संचालक (लेखा) रोहयो-७ नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवडनस्ती रोहयो-५



Scanned by CamScanner